**प्रेस नोट** दि.२७/०८/२०१९

---

## खडक पोस्टे तपास पथकाची कामगिरी
## सराईत गुन्हेगारांकडुन वाहन चोरीचे ३ गुन्हे उघड

सदर बाबत अधिक माहिती अशी की, खडक पोलीस स्टेशन तपास पथकातील अधिकारी/कर्मचारी हे खडक पोलीस स्टेशन ला हजर असतांना पोकॉ रवी लोखंडे व पोकॉ विशाल जाधव यांना त्यांचे बातमीदाराने बातमी दिली की, सुमारे दहा ते बारा दिवसांपुर्वी गुरुव्दार भवानी पेठेतुन खडक पोलीस स्टेशनचे रेकॉर्डवरील गुन्हेगार सुरुज ऊर्फ पापा जाधव रा.काशेवाडी पुणे यानेव त्याचा मित्र साहिल शेख रा.काशेवाडी,भवानी पेठ पुणे यांनी एक पांढरे रंगाची अॅव्हीएटर गाडी चोरली असुन ते धोबी घाट, शंकरशेठ रोडवर थांबलेले आहेत,अशी खात्रीशीर माहिती मिळाली आहे. त्याप्रमाणे सदरची बातमी मा. भरत जाधव, वरिष्ठ पोलीस निरीक्षक खडक पोलीस स्टेशन पुणे यांना कळवुन त्यांचे मार्गदर्शनाखाली सदर ठिकाणी तपास पथकाचे कर्मचाऱ्यासह झडप घालुन इसम नामे १) सुरज ऊर्फ पापा रमेश जाधव वय १९ वर्षे रा.काशेवाडी, भवानी पेठ पुणे २) साहिल ऊर्फ मुन्ना मुनावर शेख वय १९ वर्षे रा. दिपज्योत तरुण मंडळाजवळ, ६११, भवानी पेठ, काशेवाडी पुणे यांना ताब्यात घेतले, त्याचेकडे मिळुन आलेल्या ५०,०००/- रु किं चे पांढऱ्या रंगाची अॅव्हीएटर MH-12-LF-1323 हीचे कागदपत्राची मागणी करता ते उडवा उडवी व असमाधानकार उत्तरे देवुन लागल्याने त्यांचा आम्हांस संशय आल्याने त्यांनी सदरची गाडी ही गुरुव्दार भवानी पेठ येथुन चोरली असल्याचे सांगितल्याने, त्यागाडी बाबत खडक पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं ३३३/२०१९ भा.दं.वि क ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल असल्याचे निष्पन्न झाले आहे.

वरील दोन्ही आरोपींकडे आणखी कसुन तपास करता त्यांनी शुक्रवार पेठ व घोरपडे पेठेतुन आणखी दोन अॅक्टीव्हा गाडया चोरल्या असल्याचे सांगितल्याने त्यांचेकडुन त्रिकोणी गार्डन, भवानी पेठ या ठिकाणा वरुन १) २०,०००/- रु किं ची एक अॅक्टीव्हा तिचा नंबर MH-12-FE-5352 व २) २२,०००/- किं ची एक अॅक्टीव्हा तिचा नंबर MH-12-CP-0189 अशा मोपेड हस्तगत करण्यात आलेल्या आहेत त्याप्रमाणे अ.क्र १ या गाडी बाबत खडक पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं २२१/२०१९ भा.दं.वि क ३७९ व अ.क्र २ या गाडी बाबत खडक पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं २२६/२०१९ भा.दं.वि क ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल असुन वरील आरोपींकडुन एकुण ९२,०००/- रुपयांच्या ३ टु व्हीलर गाडया हस्तगत करण्यात आलेल्या आहेत.

सदर आरोपींचा पुर्व इतिहास पाहता, आरोपी सुरज ऊर्फ पापा रमेश जाधव याचेवर खडक पोलीस स्टेशनला घरफोडी, वाहनचोरी व इतर चोरीचे व साहिल ऊर्फ मुन्ना मुनावर शेख याचेवर खडक पोलीस स्टेशनला खुनाचा प्रयत्न, घरफोडी अशा स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत.

वर नमुद सर्व कारवाई ही श्री.श्रीकांत तरवडे, अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग पुणे , श्रीमती. स्वप्ना गोरे, पोलीस उप आयुक्त परिमंडळ १ व श्री. प्रदिप आफळे ,सहा पोलीस आयुक्त फरासखाना विभाग यांचे मार्गदर्शनाखाली खडक पोलीस स्टेशन चे श्री. भरत जाधव, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.उत्तम चक्रे पोलीस निरीक्षक (गुन्हे) तपास पथकाचे प्रभारी सहा पोलीस निरीक्षक श्री.उमाजी राठोड, पोलीस कर्मचारी, अजिज बेग, विनोद जाधव, गणेश सातपुते, राहुल धोत्रे, रवी लोखंडे, विशाल जाधव, प्रमोद नेवसे, राकेश क्षीरसागर, समीर माळवदकर, संदिप कांबळे, रोहन खैरे, इम्रान नदाफ, यांचे पथकाने केली आहे.